महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
मुख्य इमारत, कक्ष क्रमांक २०४, दुसरा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
ई-मेल santosh.ingle@nic.in

---

आयटीआय-२०२४/प्र.क्र.०१/शिकाना/व्यशि-३ दि. २१ डिसेंबर, २०२४

प्रति,

संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकडी/व्यवसाय बदल करण्याकरिता व शासनाचे इरादापत्र देण्याकरीता ऑनलाईन पोर्टल सुरु करणे व त्यासाठी कालबध्द कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत

संदर्भ :- आपले पत्र क्र. ७/खा.औ.प्र.सं./इरादापत्र/२०२४/६२७ दि.१३.११.२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये कायम विना अनुदान तत्त्वावर नवीन खाजगी औ.प्र.संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये नवीन व्यवसाय/जादा तुकडी/व्यवसाय बदल करण्याकरिता व शासनाचे इरादापत्र देण्याकरीता ऑनलाईन पोर्टल सुरु करणे व त्यासाठी कालबध्द कार्यक्रमास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने नवीन खाजगी संस्थांकरीता व विद्यमान खाजगी संस्थांमध्ये तुकडीवाढ करण्याकरीता इरादापत्र निर्गमित करण्याकरीता ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यास व त्याच्या कालबध्द कार्यक्रमास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रस्तावित मान्यता कार्यक्रम | | |
| --- | --- | --- |
| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
| १ | ०१ जानेवारी | नविन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नविन व्यवसाय / जादा तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरीता इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची जाहीरात वर्तमानपत्रात तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. |

| | | |
|---|---|---|
| २ | ०१ जानेवारी ते ३० जानेवारी | नविन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करणे आणि विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नविन व्यवसाय / जादा तुकड्या कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्याकरीता इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे. |
| ३ | २८ फेब्रुवारी | प्राप्त झालेल्या अर्जाची संचालनालयस्तरावर छाननी करणे |
| ४ | १५ मार्च | छाननीमध्ये आढळलेल्या त्रुटींची पुर्तता त्रुटी नोंदविल्यानंतर १५ दिवसामध्ये किंवा १५ मार्च यापैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत सादर करणे. |
| ५ | ०१ एप्रिल | संचालनालयाकडून योग्य त्या शिफारशीसह प्रस्ताव शासनास सादर करणे |
| ६ | | संचालनालयाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील निकष पुर्ण करणाऱ्या संस्थांना शासनस्तरावरुन अंतिम मान्यता (LOA) देणे. |

वरीलप्रमाणे शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ खाजगी संस्थांना इरादापत्र निर्गमित करण्याकरीता ऑनलाईन पोर्टल सुरु करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे. पुढील शैक्षणिक वर्षासाठी डिजीटी, नवी दिल्ली यांच्या संलग्नता प्रक्रियेच्या वेळापत्रकाच्या अनुषंगाने कालबध्द कार्यक्रमास शासनास प्रस्ताव पाठवून मान्यता घेण्यात यावी, ही विनंती.

आपला,

भास्कर बनसोडे

(भास्कर बनसोडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन